# स्टेट बँक ऑफ इंडिया एम्प्लॉईज् (एम्. एस्. पटेल) को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि., मुंबई

(रजि. नं. ६५२७/२९)

स्टेट बँक ऑफ इंडिया, मुंबई मुख्य शाखा बिल्डींग, तिसरा मजला, मुंबई समाचार मार्ग, फोर्ट, मुंबई-४०० ०२३.

वेब-साईट : www..sbimspatel.com ई-मेल : info@sbimspatel.com दूरध्वनी : २२६६ ४३६०, २२६६ १७८०


**संदर्भ क्र. :** परिपत्रक क्र. २०२२-२०२३/५ **दिनांक :** १५ डिसेंबर २०२२

सभासद बंधु भगिनींनो,

सस्नेह नमस्कार,

येणारे नवीन वर्ष २०२३ आपल्या सर्वांना आनंदाचे व भरभराटीचे जावो.

दिनांक १० डिसेंबर २०२२ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या सभेमध्ये खालील निर्णय घेण्यात आले आहेत :-

**कर्जाच्या व्याजदरात कपात :**

दिनांक १ जानेवारी २०२३ पासून सर्व कर्ज रकमेवरील व्याजदरात कपात करण्यात आली आहे, ती खालीलप्रमाणे :

| रक्कम | १ नोव्हेंबर २०१९ पासून व्याजदर (द.सा.द.शे.) | १ जानेवारी २०२३ पासून व्याजदर (द.सा.द.शे.) |
|---|---|---|
| रु.१/- ते रू.३०,००,०००/- | **९.५०%** | **९.२५%** |
| एम्.आर.बी.एस्. जमा राशीवर ९०% कर्ज | **७.००%** | **६.५०%** |

**सभासद निवृत्ती लाभ योजना-१ (MRBS–1) व सभासद निवृत्ती लाभ योजना-२ (MRBS–2) वरील व्याजदरात कपात :**

सभासद निवृत्ती लाभ योजना -१ (MRBS–1) व सभासद निवृत्ती लाभ योजना -२ (MRBS–2) वरील व्याजदरात कपात करण्यात आली आहे, ती खालीलप्रमाणे :

| | ०१ एप्रिल २०१९ पासून व्याजदर (द.सा.द.शे.) | १ जानेवारी २०२३ पासून व्याजदर (द.सा.द.शे.) |
|---|---|---|
| MRBS–1 | ६.००% | ५.५०% |
| MRBS–2 | ७.००% | ६.५०% |

**सभासद निवृत्ती लाभ योजना (MRBS – 1) अंतर्गत जमा रक्कम काढून घेण्याची मुभा :**

सोसायटीच्या ज्या सभासदांकडे सोसायटीचे कर्ज शिल्लक नाही व जे कुणालाही जामीनदार नाहीत अशा सभासदांना सोसायटीच्या सभासद निवृत्ती लाभ योजने (Members Retirement Benefit Scheme - 1) (MRBS – 1) अंतर्गत त्यांच्या जमा रकमेच्या कमीत कमी २० टक्के आणि जास्तीत जास्त ५० टक्के रक्कम काढून घेण्याची मुभा देण्यात आली होती. त्यात बदल करून आता जे सभासद जामीनदार आहेत, अशा सभासदांनासुद्धा सदर सवलतीचा लाभ मिळणार आहे. त्यामध्ये ज्या सभासदाने जामीन दिला आहे आणि ते कर्ज थकीत (Overdue) झाले असेल, अशा सभासदांना सदर सवलतीचा लाभ मिळणार नाही. ही सवलत मर्यादित कालावधीसाठी आहे. त्यामुळे ज्या सभासदांचे अर्ज **दिनांक ३१ मार्च २०२३** पर्यंत सोसायटीच्या कार्यालयामध्ये पोहचतील अशा सभासदांना ह्या सवलतीचा लाभ देण्यात येईल. त्यासाठी कराव्या लागणाऱ्या विहीत नमुन्याचा अर्ज सोसायटीच्या मुंबई येथील मुख्य कार्यालयात तसेच सोसायटीच्या वेब साईटवर उपलब्ध करून देण्यात आला आहे.

**सभासद निवृत्ती लाभ योजने (MRBS – 1) मधील जमा व्याज सभासदांना परत करणे :**

सभासद निवृत्ती लाभ योजना -१ **(MRBS – 1)** मधील दिनांक ३० सप्टेंबर २०२२ रोजी जमा झालेले सहा महिन्यांचे व्याज सभासदांना परत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यानुसार रू.१००/- किंवा त्यापेक्षा जास्त व्याजाची रक्कम असेल तर ती सभासदांच्या बँक खात्यात जमा करण्यात येईल.

आपले नम्र,

**शिवप्रसाद भामरे**
अध्यक्ष

**महेंद्र वैद्य**
मानद्-सचिव व
मुख्य कार्यकारी अधिकारी